# कोरोना महामारीमुळे ग्रामीण समुदायातील बालकांच्या आरोग्यावर व शिक्षणावर झालेले परिणाम

**विशेष संदर्भ :–** '' जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा गावातील माध्यमिक आश्रमशाळेत पाचव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे अध्ययन.''

**डॉ. सुभाष आर. गिरडे**
(सहाय्यक प्राध्यापक)
एस. आर. एम. कॉलेज ऑफ सोशल पडोली
चंद्रपूर
Mob. No - 9423961388
Email - girdelic@gmail.com

---

भारतात कोरोनाचा पहीला रूग्ण ३० जानेवारी ला आढळला, त्यानंतर मार्चपर्यंत जगभरातुन अनेक बातम्या येत होत्या आणि सगळयांचीच अस्वस्थता वाढत होती. मार्चच्या अखेरीस आपल्याकडे टाळेबंदीला सुरूवात झाली. पण मधल्या दोन महिण्यात सगळयांनी काय अनुभवल? तर एका टोकाला होती बेफिकिरी अतिविश्वास आणि अहभाव तर दुसऱ्या टोकाला भीती टोकाची चिंता आणि संताप.

आपल्याकडे कोणतीही समस्या येणे, शारिरीक आरोग्यालाही जिथे फारच कमी महत्व दिल जात. तिथे मानसिक आरोग्याची काय कथा? आपल्याकडे एकुण आरोग्यासाठी असलेले बजेट जीडीपी (GDP) च्या १.६ टक्के इतकच म्हणजे फारच कमी आहे. त्यात मानसिक आरोग्यासाठी १ टक्क्यापेक्षाही कमी बजेट आहे.

काही दिवसांपुर्वी मुंबईतल्या एका नवजात बाळाला कोरोनाची लागण झाल्याची बाब समोर आली होती. चेंबुर इथल्या खाजगी हॉस्पिटलमध्ये प्रस्तुत झालेली महिला आणि तिथल्या तीन दिवसाच्या बाळाला कोरोनाची लागण झाल्याचं लक्षात आलं होत. त्यानंतर हे हॉस्पिटल सील करण्यात आलं.

पण कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये झालेल्या टेस्ट नंतर या बाळाला लागण झाली नसल्याच समोर आल. मग प्रश्न असा आहे की, नवजात बालकांना बाळांना किंवा लहान मुलांना कोरोना व्हायरसची लागण होऊ शकते का?

फेब्रुवारी महिण्यात चीन मध्ये एका नवजात अर्थकाला जन्मानंतर अवघ्या ३० तासातच कोरोना व्हायरसची लागण झाली होती. तिथल्या मीडियाने दिलेल्या बातम्या नुसार हे बाळ २ फेब्रुवारी वुहानमध्ये जन्मले होते आणि कोरोनाची लागण झाल्यानंतर जगातलं सगळयात कमी वयाच कोरोनाचं रूग्ण ठरलं.

बाळाच्या आईला प्रस्तुती आधीच कोविड–१९ हा संसर्ग झाला होता. बाळाला या रोगाच्या संसर्ग कसा झाला. आईच्या पोटात असतानाच की जन्मल्यानंतर हे मात्र स्पष्ट होऊ शकलेलं नाही.

जर्मन फॉर अमेरिकन मेडिकल असोसिएशननुसार नव्या कोरोना व्हायरसची लागण होणाऱ्या पेशंट्सची सरासरी वय ४९ ते ५६ यामध्ये आहे. लगहान मुलांना याची लागण होण्याच्या केसेस फारच कमी आहे.

२०१६ साली झालेल्या सॉर्स आणि सर्स या जुन्या कोरोना व्हायरसच्या उद्रेकात असच काहीस घडलं होत त्यावेळी वर्ल्ड जर्मन ऑफ क्लिनिकल पेडियाट्रीक्स यामध्ये प्रसिध्द झालेल्या एका रिपोर्टनुसार लहान मुलांना या प्रकारच्या व्हायरसची लागण होण्याची शक्यता फारच कमी होती. पण यांची काय कारण आहेत हे संशोधक स्पष्ट करू शकले नाहीत.

नव्या कोरोना व्हायरस संबंधात जे संशोधन नव्याने पुढे आलंय त्यात असं आढळलं की लहान मुलांना याची लागण होण्याचं प्रमाण कमी आहे असलं तरी त्यांना याची लागण होणारच नाही असं नाही.

उद्योगपती एलन मस्क यांनी काही दिवसांपुर्वी ट्वीट करून म्हटलं की लहान मुलांना कोरोना व्हायरसचा धोका नाही. ते त्यापासुन सुरक्षित आहेत. मास्कच नाही. अनेकांना असं वाटतंय की नव्या कोरोना व्हायरस पासुन लहान मुलांना काही धोका नाही. प्रौटांचा विशेषत वयोवृध्द लोकांचा जीव होणारा हा आजार लहान मुलांसाठी मात्र धोकादायक नाही, असं काही तंज्ञाच्या संशोधनातुन जाणवंतय.

तरीही लहान मुलांना गंभीर लागण झाल्याच्या बातम्याही पुढे आल्यात खबरदारीचा उपाय म्हणुन अनेक देशांमध्ये शाळा बंद आहेत.

कोविड–१९ मुळे आरोग्याचे प्रश्न तर आहेच पण मुलांच्या शाळाचं कस करायचं? ग्रामीण भागात, विशेषत: दुर्गम भागात शाळा फक्त मुलांना शिकवण्यायं काम करतात. असं नाही. मुलांना पोषण आहार देण्याचं काम करतात, त्यांना सांभाळण्याचं (बेबी सेटींग) काम करतात, त्यांना दिवसभर गुंतवणुक ठेवतात. आणि त्याबरोबरीने शिकवतात. शाळा फक्त पाच तास बसण्याची जागा नसते. एक पुर्ण यंत्रणा असते, जिच्या जोरावर पालकांना निर्धास्त होता येतं आणि त्या शाळा आता सुरू होणार की नाही यावरच प्रश्नचिन्ह उभ आहे. सरकार म्हणतय की ज्या ठिकाणी कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव नाही, त्या ठिकाणी शाळा सुरू करणार, पण आज नसलेला प्रादुर्भाव उद्या नसलेलच याची काय गॅरंटी विशेषत: दररोज धडकी भरावी या गतीने आकडे वाढत असताना दुसरीकडे शाळा सुरू जरी झाल्या, तरी सोशल डिस्टसिंग पाळण्या इतकं इंफ्रास्ट्रक्चर बहुतांश ठिकाणी नाही, शाळा सतत सॅनिटाईज करणं, मुलांना मास्क पुरवणं याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाच्या ग्रामपंचायतींच्या मदतीने पुर्ण करावी असं शासनाने जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना सांगितल आहे. पण निधीची तजवीज झाली नाही, तर शिक्षकांनी पैसे कुठून आणायचे याचे स्पष्ट निर्देश नाहीत.

अनेक गावांचा १५ जुन पासुन शाळा सुरू करायला विरोध आहे. आम्ही त्र्यंबकेश्वर तालुक्यातल्या कोटमगाव या आदीवासी पाडयात गेलो तिथे आम्हाला भेटले बारकु सोमा आव्हाटे त्यांनी सांगितलं की गावाने एकमताने निर्णय घेतलाय की, शाळा सुरू करायची नाही, ''जुलै मध्ये पाहु. त्याच कारण की, इथल्या मॅडम येतात नाशिकहुन. आमचं म्हणणं आहे की शाळा सुरू करायची असेल तर त्यांनी इथे मुक्कामी येऊन राहाव. रोज त्या नाशिकहुन येऊन जाऊन करणार म्हणजे आमच्या पोरांना रोगाचा धोका आहेच.

या साथीमुळे जगातील बलशाही सत्ता देखील हतबल झालेल्या दिसत आहेत. अगदी सुक्ष्म स्वरूपातील या विषाणुने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समुहाला जिवंत प्रसारामुळे जगभरातील मानवी समुहाला जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे. हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. साथीच्या प्रकारातील या विषाणुचे स्वरूप त्याचा प्रसार आणि व्याप्ती याचा

ताळेबंद घालायच्या आताच या विषाणूने व्यक्त प्रमाणात पसरायला सुरूवात केलेली आहे. अजूनतरी या आजारावर लस बनवण्यात विषाणू शास्त्रज्ञांना यश आलेले नाही. भारतात देखील कोरोनाची साथ पसरत आहे. भारतात आजच्या घडीला ८६३ केसेस (सरकारी आकडयानुसार) निर्दशनास आल्या आहेत. मृत्यु १६ झाले आहेत. गेल्या २४ मार्चला रात्र सुमारास देशाला संबोधित करतांना २९ दिवसांच्या (१४ एप्रिल पर्यंतची) संचारबंदीची घोषणा पंतप्रधानांनी केली. त्या आधी त्यांनी २२ मार्च रोजी एक दिवसाचा 'जनता कर्फ्यु' पाळण्याचे आवाहन नागरिकांना केले होते. कोरोनाचा प्रादुर्भाव आवाहन नागरिकांना केले होते, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बरेच कर्तव्यदक्ष लोक अहोरात्र आपल्या जिवाची परवा न करता सेवा देत आहेत. या लोकांप्रती सामाजिक कृतज्ञता म्हणून टाळया/थाळया/शंख इत्यादी आपल्या गॅलरीमधून किंवा घरातून वाजवुन या सर्व लोकांचे आभार पंतप्रधानांनी प्रदर्शित करायला सांगितले होते. देशातील काही भागातील लोकांनी कर्फ्युचे गांभीर्याने पालन केले नाही. उलट कर्फ्युला थोड कंटाळतच पाच वाजवले आणि आपली सामाजिक कृतज्ञता व्यक्त करायला सुरूवात केली. यामध्ये काही जण ढोल—ताशा, फटाके घेऊन रस्त्यावर / चौकात पोहोचले, या सर्व गोष्टींचा अनुक्रम आपल्या सर्वांना माहित आहे अशा अवघड परिस्थितीमध्ये सर्वांनी एकत्र येऊन कोरोनाच्या विरूध्द लढायला पाहिजे. ही वेळ लिखाणातुन चुका दाखवण्याची नाही. या लॉकडाऊनच्या काळात प्रत्येकाने घरी बसून आपले सहकार्य शासकीय यंत्रणांना दिले पाहिजे. तरी देखील पंतप्रधानांच्या भाषणानंतर काही प्रश्न सतत मनात घोळत राहतात त्या संदर्भाने मी येथे उहापोह करणार आहे. तर भाषणात २१ दिवसांची बंदी झाल्यानंतर बऱ्याच ठिकाणी किराणा माल दैनंदिन गोष्टीसाठी गर्दी झाल्याची पाहायला मिळाली. पुढचे किमान २१ दिवस घरातुन बाहेर जाता येणार नसल्यामुळे बऱ्याच लोकांनी सामाजिक अंतराचे भान न ठेवता कोरोना संसर्गाचा धोका पत्करून खेरदीला बाहेर पडण्याचे ठरवले. जवळच्या किराणा दुकान आणि मॉलमध्ये गर्दी केली. दुसरीकडे सामाजिक माध्यमांवर कर्फ्युचे उल्लंघन केल्यानंतर पोलिसांची लाठी खालेल्या लोकांचे व्हिडीओं देशभरातून फिरत आहेत.

**इतिहास :**

राजुरा तालुक्याचे विभाजन होऊन शासनाने २००२ मध्ये जिवती तालुक्याची निर्मिती केली आज घडीला तालुक्यात ८४ गावे असुन ही गावे विविध समस्यानी ग्रासलेले आहेत. त्यामुळे हा तालुका नेहमी चर्चेत असतो. जवळ जवळ १८ वर्ष लोटल्यानंतरही जिवती तालुक्याच्या आणि तालुक्यातील गावांचा विकास झाला नाही.

जिवती हा अतिदुर्गम भाग असलेला तालुका असुन त्यांच्या समस्या मोठ—मोठया आहेत. एकीकडे भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या कडुन डिजिटल इंडिया मेक इन इंडिया असे नारे लावली जात आहेत. पण स्वांतत्र्योत्तर काळाच्या ६० वर्षा नंतर सुध्दा येथील जनतेला विकास कश्याला म्हणतात हे माहीत नाही. शासनाकडुन प्रत्येक गावाला रस्ते, नाल्या, दवाखाने, अंगणवाडी केंद्र, शाळा, ग्रामपंचायत कार्यालय हे स्थापन करण्यात आले. पण तेथील कर्मचारी स्थायी राहत नाही, त्यामुळे अनेक समस्या आहेत. गावाच्या विकासासाठी कोटयावधी निधी मिळतो पण जातो कुठे हा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.

प्रत्येक गावात सर्वांना शिक्षण कायदयानुसार गाव तिथे शाळा सुरू झाली पण आज घडीला काही गावात शाळा आहेत. पण शिक्षक मुख्यालयी राहत नसल्यामुळे शैक्षणिक प्रगती साधली जात नाही आहे, प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तर आतापासुनच भासु लागला आहे. इथे

बेरोजगारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे लोक रोजगारासाठी पलायन करत आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांना त्याच्या शेतीचे सातबारे नाहीत. त्यामुळे यांना शासनाकडुन कर्ज मिळत नाही, त्यामुळे शेतकरी सावकारी कर्जाला बळी पडुन आत्महत्या करत आहे?

राज्य सरकार असो की, लोकप्रतिनिधी निवडणुकीच्या हंगामात येऊन आश्वासन देऊन जातो. मग पाच वर्षे फिरून सुध्दा पहात नाहीत. त्यानंतर त्यांना त्याचा विसर पडतो पण जनतेच्या जीवचं काय त्याचं नशिबी समस्या अडचणी कधी सुटणार म्हणुन शासनाने या समस्याग्रस्त व अविकसीन गावाकडे लक्ष देऊन मुख्य समस्या तरी सोडवायला हव्या.

जनगणना २०११ च्या माहिती नुसार पिट्टीगुडा क्रमांक १गावाच स्थान आहे. पिट्टीगुडा क्रमांक १ गाव महाराष्ट्र चंद्रपूर जिल्हयातील जिवती तहसीलमध्ये आहे. हे जिल्हा मुख्यालय जिवती पासुन ८० किमी अंतरावर असुन पिट्टीगुडा क्रमांका पासुन तालुका १७ किमी  अंतरावर आहे. २००९ च्या आकडेवारीनुसार पिट्टीगुडा क्रमांक १ गाव देखील एक ग्रामपंचायत आहे.

हया गावात शिक्षणासाठी शाळा उपलब्ध आहे. पण तिथे डिजीटल शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत नाही. गावाचे एकुण भौगोलिक क्षेत्र ५१.५ हेक्टर आहे. पिट्टीगुडा क्रमांक १ ची एकुण लोकसंख्या ९५९ आहे. पिट्टीगुडा क्रमांक १ गावात सुमारे १७३ घरे आहेत. राजुरा हे जवळपास ४२ किमी अंतरावर आहे.

## अध्ययन पध्दती :

### विषयाची निवड :

संशोधनातील सर्वात महत्वाची पायरी म्हणजे विषयाची निवड होय. संशोधनाचा विषय निवडत असतांना त्या विषयासंबंधी माहिती संशोधनाची संधी सामाजिक गरज व सामान्यत वैयक्तिक अशा विविध बाबीचा विचार करणे अगत्याचे ठरते.

संशोधन करीत असतांना संशोधनाचा विषय हा संशोधन कर्त्यांच्या आवडीचा असायला पाहिजे. व संशोधनकर्त्यांला हा विषयासंबंधी संशोधन करण्याची आवड व जिज्ञासा असणे गरजेचे असते.

कोरोना या विषाणूने आज संपूर्ण जगावर परिणाम दिसुन येत आहे. अशावेळेस कोरोनामुळे ग्रामीण समुदायातील बालकांच्या आरोग्यावर व शिक्षणावर झालेल्या परिणाम बद्दल संशोधनकर्त्याला माहिती जाणून घेण्याची इच्छा झाली, त्यामुळे या कोरोना विषाणूमुळे ग्रामीण समुदायातील बालकांच्या आरोग्यावर व शिक्षणावर काय परिणाम झाले हे जाणून घेण्याची संशोधनकर्ता मध्ये उत्सुकता वाटत होती. म्हणून संशोधनकर्त्याने या विषयाची निवड केली.

### समस्या सुत्रन :

**विषय :**''कोरोना महामारीमुळे ग्रामीण समुदायातील बालकांच्या आरोग्यावर व शिक्षणावर झालेले परिणाम''

**विशेष संदर्भ :** ''जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा गावातील माध्यमिक आश्रमशाळेत पाचव्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे अध्ययन.''

**प्रारंभिक प्रश्न-**

- ग्रामीण समुदायातील पालकांची आर्थिक परिस्थिती कशी असेल?
- विद्यार्थी घरी राहत असल्यामुळे शिक्षणातील आवड कमी होत असेल का?
- विद्यार्थ्यांना योग्य आहार मिळत असेल का?
- कोरोना काळात पालक विद्यार्थ्यांची काळजी घेत असतील का?
- कोविड–१९ च्या काळात ऑनलाईन वर्ग होत असतील का?
- पालक बालकांकडुन अभ्यास करून घेत असतील का?
- कोविड–१९ च्या काळात बालकांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर कसा परिणाम झाला असेल?

**अध्ययनाचे उद्देश :**

संशोधन पूर्ण करण्याकरीता कोणते ना कोणते उद्देश ठेवणे आवश्यक असते. त्याशिवाय संशोधन कार्य पूर्ण होत नाही. संशोधन करीत असतांना कोणकोणत्या पैलुचा अभ्यास करावयाचा हे सुरूवातीलाच ठरवावे लागते त्यांना उद्देश असे म्हणतात.

१. ग्रामीण समुदायातील पालकांच्या वैयक्तिक, कौटुंबिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
२. विद्यार्थ्यांची शिक्षणातील आवड जाणुन घेणे.
३. पालकांना जाणवणाऱ्या मानसिक समस्येबाबत अध्ययन करणे.
४. कोरोना काळात पालकांना येणाऱ्या समस्या सोबत त्यांच्या समायोजनाचे मत जाणून घेणे.

**उपकल्पना / गृहितकृत्य :**

१. कोविड–१९ च्या काळात ग्रामीण समुदायातील पालकांची आर्थिक स्थिती निम्न आहे.
२. कोविड–१९ च्या काळात विद्यार्थ्यांची शिक्षणात आवड कमी दिसून येते.
३. कोविड–१९ च्या काळात पालकांना मानसिक समस्या निर्माण झाल्या.
४. कोविड–१९ च्या काळात अडचणी सोबत समायोजन करावे लागले.

**अध्ययनाचे क्षेत्र :** जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा हे गाव अध्ययनाचे क्षेत्र आहे.

**अध्ययनाचे विश्व :** प्रस्तुत संशोधनाचे विश्व जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा गावातील आश्रमशाळेतील पाचव्या वर्गात शिकणारे ४० विद्यार्थीचे पालक हे संशोधनाचे विश्व आहे.

**नमुना निवड :**

संशोधनासाठी सहहेतुक पद्धती तंत्राचा वापर करून संपूर्ण ४० विद्यार्थ्यांचे निवड करण्यात आली.

**नमुना निवडीचे प्रकार :**

१. **संभाव्यता नमूना निवड :**
२. **गैरसंभाव्यता नमूना निवड** संशोधनात समाविष्ट एकुण उत्तरदात्याची संख्या ८० असल्याने संशोधनकर्ता

Research Hub International Journal

संभाव्यता नमुना निवड मधील सहहेतुक तंत्र या पध्दतीचा उपयोग करून ४० विद्यार्थ्यांच्या पालकाची निवड करण्यात आली.

३. **तथ्य संकलन :** प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलनाची प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलणाच्या पध्दतीचा अवलंब केला आहे.तथ्य संकलनाच्या दोन पध्दती पडतात.

४. **प्राथमिक स्त्रोत** : तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही पध्दतीचा अवलंब केला जाईल. प्राथमिक पध्दतीत निरिक्षण, स्वंरचीत मुलाखत अनूसुचीचा वापर करून त्यामध्ये मुक्त व बंदीस्त प्रश्नांचा समावेश करून तथ्य संकलन करण्यात आला.

५. **दुय्यम स्त्रोत** : दुय्यम स्त्रोतामध्ये संशोधन कर्त्याने इंटरनेट पुस्तके, मासिके, जुने संशोधने अहवाल यांचा उपयोग करण्यात आला.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनात आराखडा अंशतः वर्णनात्मक व अशतः निदानात्मक स्वरूपाचा करण्यात आला.

**साहित्याचा पडताळणी :**

संशोधन कर्त्याने संशोधन करीत असतांना साहित्याचा पडताळा केला तसेच विविध पुस्तकातुन विषया संबंधीत मासिके यांचा देखिल उपयोग यात केला संशोधन कर्त्याने इंटरनेटचा वापर देखील संशोधन करीत असतांना करण्यात आला.

**संकल्पना - (कार्यात्मक )**

**कोरोना** :

"Coronavirus disease (COVID-19) is an infectious disease caused by a newly discovered coronavirus Most people infected with the COVID-19 virus will experience mild to moderate respiratory illness and recover without requiring special treatment. -- W.H.O.

**ग्रामीण समुदाय** :

''जिच्या भोवती कीर्दसाद— वाहितीला योग्य— जमीन आहे आणि जिच्यामध्ये मातब्बर शेतकरी व अनेक मजूर आहेत. अशा वस्तीला गाव म्हणतात.'' **— त्रि. ना. अत्रे**

**आरोग्य** : "Health is a state of complete physical, mental and social well-being and not merely the absence of disease or infirmity." -- W.H.O.

**शिक्षण** :

''लोकशाही निष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे, किंवा त्यांना एखादया व्यवसायात तबेज करणे नव्हे, तर त्यापेक्षा काही आर्थिक आहे, ते म्हणजे मनाचे ओदार्य, मानव प्राण्याविषयी आदर व एकसंघ राहण्याचे कौशल्य होय. यातुनच मानवी हृदयांला सौदर्य प्राप्त झाले आहे.'' **—डॉ. राधाकृष्ण**

## विषयाचे **महत्व व** व्याप्ती :

### महत्व :

या विषयाची निवड करीत असताना प्रस्तुत विषयाचे महत्व असे आहे की, अध्ययनामुळे शालेय विद्यार्थ्यांची ज्ञानाची स्थिती कमी होणार नाही. आणि कोरोनामुळे शालेय विद्यार्थ्यांना अनेक समस्याला तोंड दयावे लागते. शासना कडुन शालेय विद्यार्थ्यांना कोणती मदत मिळाली ती मदत घेताना त्यांना पुन्हा समस्या निर्माण झाल्या. का हे जाणून घेण्यास हे संशोधन महत्वाचे कार्य करते.

### व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही अप्रत्यक्षपणे उद्देशातुन स्पष्ट झाली आहे. प्रस्तुत अध्ययन हे जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा गावातील विद्यार्थ्यांचे अध्ययन करण्यात आले आहे. हे संशोधन फक्त जिवती तालुक्यातील पिट्टीगुडा गावातील विद्यार्थ्यांपुरते मर्यादीत आहे.

प्रस्तुत संशोधनातुन निघणारे सुचना व निष्कर्ष यावरून त्यांना त्यांच्या कार्यात येणाऱ्या समस्यावर उपाययोजना नियोजन करून या संशोधनाचा उपयोग खाजगी, निमशासकीय व शासकीय संस्थेला उपयोगात पडेल.

### प्रमुख शोध :

**कोणत्याही विषयावर संशोधन करीत असतांना ज्या प्रमाणे उद्देश आणि उपकल्पना यांच्या आधारावर संशोधन कार्य होते. त्याचप्रमाणे निष्कर्ष सुचना यांच्या नंतर संशोधन विषयात आपणास कोणता शेध लागला व आपण यातुन काय माहिती प्राप्त केली ते संशोधन कार्याचा शेवटी माहिती होते. कोरोना महामारीमुळे ग्रामीण समुदायातील बालकांच्या आरोग्यावर व शिक्षणावर झालेल्या परिणामाबाबत शोध घेतला व संपूर्ण सारणीच्या स्वरूपात दर्शविण्यात आली. जास्तीत जास्त पालक हे ३५ ते ४० वयोगटातील २० असुन त्यांची टक्केवारी ४०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे हिंदु धर्माचे ३८ असून त्यांची टक्केवारी ९५.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे एन.टी. जातीचे प्रवर्गातील २१ असून त्यांची टक्केवारी ४२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे २० ते ५० हजार म्हणणारे १९ असुन त्यांची टक्केवारी ४७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे विभक्त प्रकारच्या कुटूंबाचे २१ असुन त्यांची टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे माध्यमिक शिक्षण म्हणणारे २३ असून त्यांची टक्केवारी ५७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे कच्या स्वरूपाचे घर म्हणणारे २१ असुन त्यांची टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे स्वत:चे घर म्हणणारे २८ असुन त्यांची टक्केवारी ७०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे बि.पी.एल. धारक म्हणणारे २१ असुन त्यांची टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे बॅकेमध्ये बचत करतात म्हणणारे २० असुन त्यांची टक्केवारी ५०.०० आहे.।जास्त पालक हे कधी–कधी म्हणणारे असुन त्यांची टक्केवारी ७७. ५० आहे. जास्तीत जास्त पालक हे अंशत: म्हणणारे २२ असुन त्यांची टक्केवारी ५५.०० आहे. जास्तीत जास्त पालक कधी–कधी म्हणणारे २४ असुन त्यांची टक्केवारी ४०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे २१ असुन त्यांची टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे ३५ असुन त्यांची टक्केवारी ८७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे पाठयपुस्तकातुन म्हणणारे २० असुन त्यांची टक्केवारी ५०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे २२ असुन त्यांची टक्केवारी ५५.०० आहे.**

Research Hub International Journal

जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे ३९ असुन त्यांची टक्केवारी ९७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे आर्थिक समस्या म्हणणारे २५ असुन त्यांची टक्केवारी ६२.५० आहे. जास्तीत जास्त पालक तांत्रीक समस्या म्हणणारे १३ असुन त्यांची टक्केवारी ३२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे मानसिक समस्या म्हणणारे २२ असुन त्यांची टक्केवारी ५५.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे मुलांना मार्गदर्शन करणे म्हणणारे २१ असुन त्यांचे टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे पाल्याची आई म्हणणारे १८ असुन त्यांची टक्केवारी ४५.०० आहे. जास्तीत जास्त पालक वेळेचे नियोजन म्हणणारे २२ असुन त्यांची टक्केवारी ५५.०० आहे.

जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे ३९ असुन त्यांची टक्केवारी ९७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे टि.व्ही. म्हणणारे १६ असुन त्यांची टक्केवारी ४०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे मास्कचा वापर म्हणणारे १२ असुन त्यांची टक्केवारी ३०.०० आहे. जास्तीत जास्त पालक हे मुलभूत गरजेच्या समस्या म्हणणारे १५ असुन त्यांची टक्केवारी ३७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे योगा करणे म्हणणारे २३ असुन त्यांची टक्केवारी ५७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे सर्वसामान्य म्हणणारे १५ असुन त्यांची टक्केवारी ३७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे अभ्यास घेणे म्हणणारे १९ असुन त्यांची टक्केवारी ४७. ५० आहे. जास्तीत जास्त पालक हे अंशत: म्हणणारे २७ असुन त्यांची टक्केवारी ६७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे होय म्हणणारे ३९ असुन त्यांची टक्केवारी ९७.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे अंशत: म्हणणारे २१ असुन त्यांची टक्केवारी ५२.५० आहे. जास्तीत जास्त पालक हे वरीलपैकी सर्व म्हणणारे १८ असुन त्यांची टक्केवारी ४५.०० आहे.

**उपकल्पनाचा पडताळा :**

- कोविड–१९ च्या काळात ग्रामीण समुदायातील पालकांची आर्थिक स्थिती निम्न आहे. हे सारणी क्र. २.३, २.७, २.८, २.९, २.१० वरून सत्य ठरली आहे.
- कोविड–१९ च्या काळात विद्यार्थ्यांची शिक्षणात आवड कमी दिसुन येते हे सारणी क्र. ३.१, ३.३, ३.५, ३.६, ३.७ वरून सत्य ठरली आहे.
- कोविड–१९ च्या काळात पालकांना मानसिक समस्या निर्माण झाल्या हे सारणी क्र. ४.१, ४.२, ४. ३, ४.४ वरून सत्य ठरली आहे.
- कोविड–१९ च्या काळात अडचणी सोबत समायोजन करावे लागले हे सारणी क्र. ५.४, ५.५ यावरून सत्य ठरली आहे.

**निष्कर्ष :**

१) कोरोना महामारीमुळे ग्रामीण समुदायातील बालकाच्या पालकांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती साधारण आहे.

२) विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड कमी दिसून आली.

३) विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत पालकांना माणसिक समस्या निर्माण होते.

४) कोरोना काळात पालक वर्ग त्या निर्माण होणाऱ्या समस्यांचे समायोजन करीत असतो.

५) कोरोना काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणातुन आरोग्य व शैक्षणिक समस्या निर्माण झाल्या.

Research Hub International Journal

## सुचना व शिफारशी :

१) शासनाने विद्यार्थ्यांना पाठय–पुस्तके मोफत उपलब्ध करून दयावी.
२) कोविड–१९ च्या काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईनच्या माध्यमातुन अभ्यासक्रम शिकवावा.
३) शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावी.
४) कोरोना काळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोय–सुविधा दयाव्या.
५) विद्यार्थ्यांना वेळोवेळी शिक्षण व आरोग्यविषयक मार्गदर्शन करावे.
६) शासनाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून दयावी.
७) कोरोना काळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटूंबाना निर्माण होणाऱ्या आर्थिक स्थितीचा विचार शासनामार्फत केला जावे

## संदर्भ ग्रंथसूची :


- बोधनकर व अलोणी, सामाजिक संशोधन पध्दती, श्री. साईनाथ प्रकाशन, भगवाधर कॉम्प्लेक्स धरमपेठ, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९९
- मेश्राम सुरेश,प्रात्यक्षिक समाजकार्य संशोधन, यश प्रकाशन, नागपूर २००९
- वृत्तपत्र , चंद्रपूर समाचार दि. २८ जुन, २०२०
- वृत्तपत्रे इंटरनेट, WWW.WIKIPEDIA.COM, WWW.bbc.com/marathi/india53013246 Villageinfo.in/Maharashtra /pittigudano.1
- हडप गो.नी., कामगार विश्व दशा आणि दिशा प्रकाशन, नागपूर, २००५


Research Hub International Journal